Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ४८ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.८ नोव्हेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.









## समाजरत्न
# डॉ.अंकुश आगलावे

जब टूटने लगे हौसले
तो बस याद रखना
बिना मेहनत के हासिल
तख्तोताज नही होते
ढुंड लेना अंधेरो मे
मंजिल अपनी
जुगनू कभी रोशनी के
मोहताज नही होते



या ओळी आठवल्या सामाजिक क्षेत्रात अग्रगण्य व्यक्तिमत्त्व म्हणून सर्वज्ञात वरोरा येथील समाजसेवी श्री.अंकुश आगलावे यांच्या व्यक्तिमत्वाचा वेध घेताना. जिद्द, परिश्रम आणि चिकाटी या गुणांच्या जोरावर माणूस काय करू शकतो? याची प्रचिती अंकुशरावांच्या व्यक्तित्वातुन प्रत्ययास येते. साधारणतः माणसाच्या चार जाती असतात. पहिली जात म्हणजे अंधाराकडून प्रकाशाकडे जाणारे, दुसरी जात प्रकाशाकडून अंधाराकडे जाणारे, तिसरी जात अंधाराकडून अंधाराकडे जाणारे आणि चौथी जात म्हणजे प्रकाशाकडून प्रकाशाकडे जाणारे. गरिबी, श्रीमंती ही माणसाच्या हातात नसते. आपण कुठल्या कुटुंबात जन्म घ्यावा? गरीब की श्रीमंत. हे आपल्या हातात नसले तरी कर्तृत्वाच्या भरोशावर आपण स्वतःची प्रगती करू शकतो. यशोशिखर गाठू शकतो. अशा प्रयत्नावादी लोकांचा समावेश अंधारातून प्रकाशाकडे जाणाऱ्या जमातीत करता येईल. ही माणसे प्रयत्नवादी असतात. ते स्वकर्तृत्वातून अपार कष्ट झेलीत मनात योजलेले ध्येय गाठीत स्वप्ने साकार करण्यासाठी धडपडत असतात. अपार कष्ट व प्रचंड मेहनतीच्या जोरावर स्वतःचाच नाही तर सर्वांचा कायापालट करण्याची शक्ती त्यांच्यात असते. ही माणसे समाजासाठी प्रेरणास्थान असतात. असेच स्वकर्तुत्वाने आकाश पेलीत यशोशिखर गाठणाऱ्यांपैकी असेलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे वरोरा येथील समाजरत्न अंकुशराव किसनराव आगलावे. ज्यांनी स्वकर्तृत्वाच्या भरोशावर आकाश पेलीत सामाजिक, राजकीय व आध्यात्मिक क्षेत्रात आपले स्वतंत्र विश्व निर्माण केले आहे. नेत्रदीपक प्रगती करताहेत.अनेक जाती धर्माच्या माणसांना एकत्र जोडण्याचे पवित्र काम करताहेत. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांनी प्रभावित असलेले अंकुश आगलावे हे स्थानिक समाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करू पाहणाऱ्यांसाठी दीपस्तंभ ठरले आहे. लोकसेवेसाठी अठरा अठरा तास अविरत कष्ट उपसित त्यांनी मोठा लोकसंग्रह उभा केला आहे.

अंकुशराव किसनजी आगलावे. भद्रावती तालुक्यातील पाटाळा हे त्यांचे मूळ गांव. वडील किसनराव पैकाजी आणि आई अनुसयाबाई यांचे ते जेष्ठ पुत्र. घरांत पाच भावंडे. अंकुश,लहू, हनुमान,रेखा आणि संगिता. आईवडील शेती व्यवसाय करीत.वडील त्याकाळातील चवथा वर्ग शिकलेले. त्यामुळे त्यांना अभ्यासाचे महत्त्व होते. सामान्य शेतकरी परिवाराच्या नशीबी असलेली आर्थिक विवंचना त्यांच्याही घरी असली तरी आपल्या मुलांनी शिकावे,मोठे होऊन नावलौकिक कमवावा हे प्रत्येक वडीलांचे स्वप्न असते, किसनरावांनाही तसे वाटत. त्यांनी थोरला मुलगा अंकुश यांचे पाटाळा गावाजवळील मनगांव (थोराणा) येथील प्राथमिक शाळेत नांव टाकले. आजोबा पैकाजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारसरणीचे होते. ते अंकुश यांचे वडील किसनजी यांना स्वतःसोबत राष्ट्रसंतांच्या यावली या गावी घेऊन जायचे. तिथे दोघेही मुक्कामी असत. त्यामुळे वडिलांच्या आणि आजोबांच्या वैचारिक विचारांचा वारसा स्वाभाविकच अंकुशरावांवरती पडला. सामाजिक कार्याचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष धडे त्यांना बालपणीच मिळाले. मनगांव (थोराणा) येथील प्राथमिक शिक्षणानंतर इयत्ता पाचवी ते सातवी त्यांनी पाटाळा येथील शाळेत शिक्षण घेतले. पुढे इयत्ता आठवी ते दहावी माजरी येथील कर्मवीर विद्यालयात शिकले. वर्गात ते अतिशय चौकस आणि हुशार विद्यार्थी म्हणून ज्ञात होते. इयत्ता दहावी सेंटरवरून पहिला क्रमांकाने पास होण्याचा त्यांना मान मिळाला. या शिक्षणकाळातील त्यांचे बालपण अतिशय कष्टामध्ये गेले. आर्थिक परिस्थिती कमजोर असल्याने तारांबळ उडायची. त्यांना शेतीकामावर जावे लागत असे. गाई म्हशी राखणे, शेतातील कापूस वेचणे, वखरणे, डवरणे अशी शेतीकामे करीत बालपण कष्टात गेले. कष्टांचा ससेमिरा इथेच थांबला नाही. दहाव्या वर्गात शिकत असताना रोजगार हमी योजनेत नाली खोदण्याचे काम करून आपले शिक्षण पूर्ण करण्याची पाळी त्यांच्यावर आली.घरी राष्ट्रसंतांची भक्ती असल्याने मोठीआई विठाबाई यांच्यासोबत सकाळ संध्याकाळ तुकडोजी महाराजांच्या मंदिरात प्रार्थनेत जाणे ही दिनचर्या ठरली. आजोबा पैकाजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या यावली गावात त्यांच्या वडिलांना मुक्कामी घेऊन जात असत. शालेय शिक्षण सुरू असताना त्यांच्या गावात एकदा कराटे स्पर्धा भरली. या स्पर्धेत सुनील कोपेलवार नावाचे प्रशिक्षक होते. या स्पर्धेत अंकुशरावांनी प्रवेश घेतला. कराटेचे प्रशिक्षण घेऊन त्यात ब्लॅक बेल्ट ४ डॉन मिळविला. १९९३ मध्ये ते आर्मीमध्ये नोकरीवर रुजू झाले. पंजाब जालंदर येथे एक वर्ष ट्रेनिंग पूर्ण झाले. दरम्यान वडील किसनराव यांच्या स्वर्गवासानंतर घरातील

**प्रासंगिक**



डॉ.यशवंत घुमे
मो. ९८२२२३३९१२
e sahyandrinews@gmail.com

उर्वरित पान ४ वर

## संपादकीय

# ७० तासांचा 'निरक्षर' विवेक!



'इन्फोसिस'चे संस्थापक आणि ज्येष्ठ उद्योगपती नारायणमूर्ती यांच्या 'तरुणांनी आठवड्यातले सत्तर तास काम केले पाहिजे,' या वक्तव्यामुळे खूपच धुरळा उडाला आहे. कुणी या वक्तव्याचे समर्थन करत आहे, तर कुणी कडाडून विरोध. गेल्या आठवड्याभरात या विषयाबद्दल सोशल मीडियावर अगदी पीक आले आहे. त्यातील बहुतेक चर्चा या '७० तास काम करणे हे योग्य आहे की नाही?' अशा आशयाच्या आहेत. मात्र 'हो किंवा नाही' अशा संकुचित दृष्टिकोनातून या मुद्द्याकडे बघणे म्हणजे त्याचे अगदीच सुलभीकरण झाले. कोणतेही वक्तव्य समजून घेताना त्यामागील संदर्भ व त्यामधील भावार्थ समजून घेतला पाहिजे. केवळ शब्दशः अर्थ वेगळा काढून काही साधत नाही. तेव्हा, असे वक्तव्य नारायणमूर्ती यांनी कोणत्या संदर्भात केले, ते समजून घेऊया.'भारताची स्वातंत्र्योत्तर ७५ वर्षे' या विषयावर मोहनदास पै यांनी नारायणमूर्ती यांची ५३ मिनिटांची प्रदीर्घ मुलाखत घेतली. स्वातंत्र्यानंतरची भारताची कामगिरी, त्यातले वेगळेवेगळे वेगवेगळे टप्पे यावर त्यांनी आपली मते व्यक्त केली. नंतर ही चर्चा भविष्याकडे वळते. त्याचा काहीसा गोषवारा असा... जगातील सध्याच्या भौगोलिक व राजकीय घडामोडी बघता पुढील दहा ते वीस वर्षांत चीन व भारत या आशियाई देशांना आर्थिक महासत्ता बनायची मोठी संधी आहे. विकसित देशात वृद्ध लोकसंख्येचे प्रमाण झपाट्याने वाढते आहे. अशा पार्श्वभूमीवर भारताने ही संधी दवडता कामा नये. गेल्या २५ ते ३० वर्षांत ज्या देशांनी मोठी प्रगती केली आहे, अशा देशांचा अभ्यास आपल्याला बरच काही शिकवून जाईल. उदाहरणार्थ, त्यांनी असे कोणते धोरणात्मक निर्णय घेतले जे त्यांची अर्थव्यवस्था वाढवू शकले. मूर्ती यांच्या मते चीनची प्रगती व तसेच दुसऱ्या महायुद्धानंतर जपान व जर्मनीने मारलेली आर्थिक मुसंडी अभ्यासण्याजोगी आहे. भारतात तरुणांची लोकसंख्या जास्त असल्याने (व ते आपले बलस्थान असल्याने) भारताला जगाच्या आघाडीवर नेण्यात त्यांनी पुढाकार घ्यावा. पाश्चात्य देशातील अनिष्ट गोष्टींचे अनुकरण करण्यापेक्षा तरुणांनी भारताच्या प्रगतीसाठी झटावे.या ठिकाणी नारायणमूर्ती एका महत्त्वाच्या मुद्द्याला स्पर्श करतात. (जगात सर्वाधिक लोकसंख्या असूनही) भारताची उत्पादकता जगात सर्वांत कमी आहे. सरकारातील भ्रष्टाचार निर्मूलन, कार्य उत्पादकतेत वाढ, नोकरशाहीतील दिरंगाईला आळा असे उपाय केल्याशिवाय आपण जागतिक स्पर्धेत तग धरू शकणार नाही. यासाठी तरुणांनी 'हा माझा देश आहे' हा मंत्र उरी बाळगून आठवड्याचे ७० तास झटावे. दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मन व जपानी लोकांनी हेच केले व प्रगती साधली. भारताला सगळीकडूनच आदर मिळतोय. त्या भांडवलावर आता आपल्याला पुढचा टप्पा गाठायचा आहे. तो गाठण्यासाठी आपल्याला परिश्रम घ्यावे लागतील, स्वयंशिस्तीने काम करावे लागेल व आपली कार्य उत्पादकता वाढवावी लागेल.आता या सर्व मुलाखतीतला बाकी संदर्भ वगळून फक्त ७० तासांचा मुद्दा सगळीकडे गाजतो आहे. भारतीय कामगार कायद्यानुसार आठवड्याचे कामाचे तास ४८ आहेत. म्हणजे तेथे कायद्याचे बंधन आहे. शिवाय दररोज १२ ते १४ तास काम करणे आरोग्यशास्त्राला धरून नाही. तेव्हा या मुद्द्याला आठवड्याचे ७० तास काम या तांत्रिक चष्म्यातून बघणे योग्य नाही. नारायणमूर्ती यांच्या मुलाखतीतील दोन कळीचे मुद्दे आहेत. त्यावर चर्चा व मंथन घडणे आवश्यक आहे. पहिला म्हणजे भारतातील कार्य उत्पादकता वाढवणे आणि दुसरा म्हणजे तरुणांची भविष्यातील देश घडवण्यातील भूमिका.कार्य उत्पादकतेबाबत नारायणमूर्ती म्हटल्याप्रमाणे जपान व जर्मनी हे दोन देश कायमच आघाडीवर राहिले आहेत. जपानने आपल्या संस्कृतीला सुसंगत अशी अनेक व्यवस्थापन तंत्रे विकसित केली व त्याचा उत्पादकता वाढीसाठी सुयोग्य वापर केला. नव्वदीच्या दशकात टीपीएम, टीक्यूएम, क्वालिटी सर्कल, कायझन अशा अनेक जपानी प्रणाली भारतात आणून त्या अभ्यासल्या गेल्या. जपानी कर्मचाऱ्यांची कामाबद्दलची प्रतिबद्धता, वक्तशीरपणा, कामातील अचूकता वादातीत आहे. त्याचप्रमाणे जर्मन कर्मचाऱ्यांचा वक्तशीरपणा, परिपूर्णतेचा ध्यास, तांत्रिक विषयातील खोली यासाठी ते जगभर प्रसिद्ध आहेत. आजही जर्मन किंवा जपानी बनावटीची कार जगात सर्वोत्तम मानली जाते. भारताला जागतिक उत्पादन केंद्र बनवताना आणि अधिकाधिक जागतिक व्यवसायांना भारतात आकर्षित करताना आपल्याला केवळ तांत्रिक कौशल्य वाढवून चालणार नाही. जागतिक दर्जाचे उत्पादन कमीत कमी खर्चात बनवण्याची मानसिकता सर्वांनाच बाळगावी लागेल. त्यासाठी कर्मचाऱ्यांचा वक्तशीरपणा, कामाचे पूर्ण तास वेळ न दवडता झटून काम करणे, दिलेले काम विलंब न करता पूर्ण करणे, टीममध्ये सर्वतोपरी योगदान देणे, कामात चुका न करता व चुकीसाठी सबबी न देणे, कामगिरीत सतत सुधारणा करत राहणे हे सर्व कार्यउत्पादकतेच्या परिघात येते. हे सरकारी तसेच कॉर्पोरेट क्षेत्रात काम करणाऱ्या सर्वांसाठी महत्त्वाचे आहे. भारतात 'मेक इन इंडिया'सारखा उपक्रम बाळसे धरत असतानाच या वरील सर्व गोष्टींवर तेवढाच भर द्यायला हवा.कुठल्याही देशाच्या राष्ट्र उभारणीत तरुणांचा सिंहाचा वाटा असतो. दुसऱ्या महायुद्धानंतर जपान व जर्मनी या देशातील कर्मचाऱ्यांनी आपल्या कामाकडे केवळ वेतनप्राप्तीसाठी नोकरी असे न मानता त्याला राष्ट्रकर्तव्य मानले व अधिक कष्ट उपसले. तसेच, आज कोणत्याही यशस्वी उद्योजकाला किंवा कंपनीतील वरिष्ठाला यशाचे गुपित विचारल्यास ते त्यांच्या तरुणपणातील कष्टांकडे अंगुलिनिर्देश करतात. म्हणजेच तरुणपणीचे परिश्रम, शिस्त हाच पुढील यशाचा पाया असतो. त्यामुळे तरुणांनी नवीन कौशल्ये आत्मसात करावीत, आपली स्वयंशिस्त व कार्य उत्पादकतेने सर्वांसमोर आदर्श निर्माण करावा हे सयुक्तिक आहे. कुणालाही हेवा वाटेल अशी प्रगतीची संधी आता भारतासमोर चालून आली आहे. ती आपण क्षुल्लक गोष्टींवर चर्चा करून वेळ दवडण्यापेक्षा योग्य व महत्त्वाच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करून मिळवूया.

# गावकारभाऱ्यांचा गुलाल



राज्यातील ग्रामीण राजकारणाचा कणा मानल्या गेलेल्या सुमारे सव्वादोन हजार ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे निकाल जाहीर होत आहेत. ढोबळ मानाने पाहिल्यास राज्यातील सत्ताधारी महायुतीचे या निकालात वर्चस्व दिसून येत आहे. भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसचा अजित पवार गट यांनी सर्वाधिक जागा आणि पंचायती जिंकल्याचा दावा केला आहे. त्यानुसार पाठोपाठ शिवसेनेचा शिंदे गट, काँग्रेस, राष्ट्रवादीचा शरद पवार गट आणि शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाचा क्रमांक लागल्याचे समोर येत आहे. तर दुसरीकडे, काँग्रेसनेही आपल्याकडे ७२१ ग्रामपंचायती आल्या असून महाविकास आघाडीस १,३१२ ग्रामपंचायतींमध्ये विजय मिळाल्याचा दावा केला आहे.दाव्या-प्रतिदाव्यांचे हे कवित्व आणखी काही काळ चालणार आहे. महायुतीच्या विजयाचा दावा पुढे न्यायचा झाला, तर भाजपने राज्याच्या सर्व भागांमध्ये कमी-अधिक प्रमाणात मिळविलेले स्थान पाहता पूर्वी शहरी पक्ष म्हणून हिणविण्यात येणाऱ्या या पक्षाने ग्रामीण भागातही हायपाय पसरल्याचे स्पष्ट होते. त्याबरोबरच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेल्या फुटीचाही सत्ताधाऱ्यांना फायदा झाल्याचेही या निकालावरून म्हणता येईल. विशेषत: उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे ग्रामीण भागातील वर्चस्व या निकालाच्या निमित्ताने सिद्ध झाले; तर शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या बंडाच्या धक्क्यातून अद्याप नीट सावरलेली दिसत नाही. एकनाथ शिंदे यांनीही या स्पर्धेत स्थान राखले असले, तरी अजित पवार यांच्या गटाने त्यांच्यापेक्षा अधिक जागा मिळविणे, ही शिंदे गटाच्या दृष्टीने भविष्यातील धोक्याची घंटा आहे. काँग्रेसने विदर्भासारख्या भागात आपले स्थान टिकविले, तर मुंबई-ठाण्यासारख्या शहरांपलीकडे जाऊन ग्रामीण भागाकडे अधिक लक्ष दिले पाहिजे, हा संदेश या उद्धव ठाकरे गटासाठी या निकालांनी दिला आहे.या निकालांनी महायुतीला गुलाल उधळण्याचे निमित्त दिले खरे; मात्र, ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे स्वरूप आणि त्यातील मुद्दे पाहिले, तर हे पूर्णसत्य म्हणता येणार नाही. 'राज्य सरकारच्या कामाला जनतेने ही पावती दिली,' असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले असून याच पद्धतीने राज्यातील विधानसभाही जिंकू, असाही त्यांचा दावा आहे. तसे असेल, तर गेल्या दोन वर्षांहून अधिक काळ रखडलेल्या महापालिकांच्या निवडणुका घेण्यास सत्ताधारी कशामुळे का कू करतात, आणि या निवडणुका कधी घेणार, याचीही उत्तरे त्यांच्याकडून अपेक्षित आहेत. ग्रामपंचायतींच्या निवडणुका पक्ष किंवा राजकीय विचारसरणीवर होत नाहीत, तर त्यामध्ये स्थानिक गटातटांचे राजकारण महत्त्वाचे ठरते. अनेकदा 'बड्या नेत्यांनी आपापल्या भागात वर्चस्व राखले, किंवा त्यांना या निकालांनी धक्का दिला,' असेही निष्कर्ष काढले जातात. मात्र, एकाच गावातील परस्पर विरोधी गट एकाच पुढाऱ्याच्या आशीर्वादाने नांदत असतात, ही अनेक गावांतील वस्तुस्थिती आहे.सर्वाधिक वेगाने नागरीकरण होणारे राज्य, असा लौकिक असला, तरी अजूनही जवळपास निम्मा महाराष्ट्र ग्रामीण भागातच असल्याने ग्रामपंचायतींच्या निवडणुकांना वेगळे महत्त्व आहे. पक्षीय विचारांच्या पलीकडे जाऊन व्यक्तिगत संबंधांच्या आधारे या निवडणुका अधिक हिरिरीने लढविल्या जातात. मतदानाच्या टक्केवारीतून त्यातील लोकसहभागही दिसून येतो. महात्मा गांधी यांनी पाहिलेल्या ग्रामस्वराज्याच्या स्वप्नातील ग्रामपंचायती, ही जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशातील लोकशाहीची बालवाडी म्हणता येइल. 'पंचायत राज' संकल्पनेतून साकारलेल्या ७२ व ७३ व्या घटनादुरूस्तीने विकेंद्रीकरणाच्या तत्त्वाने स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक बळ दिले. वित्त आयोगाच्या थेट निधीने गावच्या विकासाची सूत्रेही हाती आली आहेत. मात्र, गावकी-भावकी, जातीपातींची गणिते आणि वर्चस्वाचे हिशेब या निवडणुकांमध्ये महत्त्वाचे ठरतात, हे चित्र दिसून येत आहे. पैशांच्या वारेमाप वापराच्या कहाण्याही निवडणुकीमध्ये चर्चेत येतात. तरीही या निवडणुकांमध्ये तरुण-सुशिक्षितांचा सहभाग आणि आरक्षणानंतर विकासातील महिलांचा हातभार, ही बदलत्या काळाची सुखावणारी पावले ठरावीत. काही दशकांपूर्वीचे महिला पदाधिकाऱ्यांच्या पतीदेवांनी त्यांच्या वतीने कारभार चालविण्याचे चित्र पुसट होत असून महिला नेतृत्व स्वयंपूर्ण होणे, ही आशादायक बाब आहे. हेच सूत्र समोर ठेवून नव्या कारभाऱ्यांनी स्वच्छता, आरोग्य सुविधांसारखे मुलभूत प्रश्न सोडविण्याकडे राजकारण बाजूला ठेवून पावले टाकली पाहिजेत. अनेक शहरांलगतच्या गावांमध्ये नागरीकरणामुळे वाढत्या लोकसंख्येला सुविधा पुरविण्यात निधी आणि तज्ज्ञ मनुष्यबळासारख्या अडचणी या ग्रामपंचायतींपुढे आहेत. त्यांना सक्षम करण्यासाठी सरकारनेही पाठीशी उभे राहिले पाहिजे. यापुढे कामकाज चालविताना निवडणुकीतले राजकारण विकासाआड येणार नाही, याची जबाबदारी विजयी कारभाऱ्यांवर नक्कीच आहे.

# शुल्काचे ओझे कमी होईल?



शुल्क नियामक प्राधिकरणाने (एफआरए) निर्धारित केलेले शुल्क वगळता अन्य कोणत्याही स्वरूपात अतिरिक्त फी न आकारण्याच्या सूचना राज्यातील विविध खासगी व्यावसायिक महाविद्यालयांना दिल्या गेल्या आहेत. अतिरिक्त शुल्क आकारल्यास किंवा विलंब शुल्कापोटी विद्यार्थ्यांकडून दंड घेतल्यास कारवाई करण्याची भूमिकाही घेण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांवरील शुल्काचे ओझे कमी करण्यासाठीचे हे पाऊल स्वागतार्ह असले, तरी हे पाऊल कृतिशील ठरणार का? शैक्षणिक शुल्क, विकास शुल्क आणि ग्रंथालय, प्रयोगशाळा, जिमखाना, संगणक, स्टेशनरी अशा विविध नावांखाली वाढीव शुल्क भरताना अनेक पालकांचे कंबरडे मोडते. गेल्या अनेक वर्षांपासून हा भुर्दंड विद्यार्थी आणि पालक सहन करीत आले आहेत. ताज्या सूचनेमुळे हा भुर्दंड भरणे बंद झाले तर चांगले होईल. मात्र, मूळ शुल्कच वाढवून घेण्यापासून नवनवीन मार्गांनी अतिरिक्त शुल्क घेण्याचा प्रकार वाढण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे अतिरिक्त शुल्काची आकारणी बंद होईल, असे समजणे भाबडेपणाचे ठरेल. खासगीच नव्हे, तर सरकारी विनाअनुदान आणि सरकारकडून अनुदान घेणाऱ्या महाविद्यालयांकडूनही अशा अतिरिक्त शुल्काची आकारणी होते. शिक्षणाच्या खासगीकरणाची प्रक्रिया गतिमान झाल्यापासून म्हणजे गेल्या तीन दशकांपासून शिक्षण महाग होत आहे. यात या अतिरिक्त शुल्काचा वाटा निश्चितच आहे; परंतु मुख्य वाटा आहे, तो शिक्षण शुल्काचा.शुल्क नियामक प्राधिकरणाकडून शुल्क निर्धारित केले जात असले, तरी आपल्याला हवी तेवढी फी कशी वसूल करता येईल, याची तयारी खासगी संस्था करीत असतात. पायाभूत सुविधा, शैक्षणिक सेवा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन, नवनवीन तंत्रज्ञान आदी अनेक गोष्टींवरील मोठ्या खर्चाचा उल्लेख करून प्रत्येक विद्यार्थ्यामागील खर्च खासगी संस्थांकडून प्राधिकरणाला सादर केला जातो. या आकडेवारीचा अभ्यास करून प्राधिकरण शुल्क ठरविते. वास्तविक, संबंधित महाविद्यालय खरोखरीच विद्यार्थ्यांवर इतका खर्च करते का, तिथे सर्व सुविधा आहेत का, शिक्षक आणि शिक्षकेतरांना नियमित पूर्ण वेतन दिले जाते का, हे तपासण्याची गरज आहे. पूर्ण वेतन मिळत नसल्याच्या तक्रारी खासगी महाविद्यालयांतील अनेक शिक्षक खासगीत करीत असतात. या पार्श्वभूमीवर, आपल्या सूचनांची योग्य अंमलबजावणी झाली की नाही हे पाहण्यासाठी प्राधिकरणाला प्रत्यक्ष महाविद्यालयांत जावे लागेल आणि शुल्क निर्धारणात अधिक पारदर्शकता आणावी लागेल.

# दिल्लीचा श्वास घुसमटला!

प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा बंद करायची वेळ दरवर्षी साधारणपणे जानेवारीमध्ये येते, असा अनुभव आहे. यावेळी मात्र दिल्लीच्या प्रदूषणाने महिनाभर आधीच रौद्र रूप दाखवले आहे. मागचा आठवडा दिल्लीतील वायू गुणवत्ता निर्देशांक ५०० ते ९९० पर्यंत आहे. ही आरोग्यासाठी अतिधोकादायक श्रेणी असते.''प्रदूषण आटोक्यात आणता येत नसेल तर विस्फोटके टाकून सर्वांना मारून टाका'', अशा कठोर शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने दिल्लीतील प्रदूषणाबाबत सरकारला सुनावले होते. त्याचे पुढे काय झाले? निव्वळ सत्तेसाठी हपापलेले राज्यकर्ते सर्वसामान्य लोकांना वेठीस धरतात आणि त्यांच्या आरोग्याचा खेळ मांडतात, तेव्हा कोणालाच संताप कसा येत नाही? दिल्लीतील प्रदूषणामुळे इथल्या शाळा बंद करायची वेळ आली आहे.प्रदूषणामुळे दिल्लीतील लोकांचे आयुष्य दहा वर्षांनी कमी होत असल्याचे ताजे अहवाल आहेत. मोकळा श्वास घेण्यासाठीचे धोरण कायम नस्तीबंदच राहिले. केंद्र आणि राज्य सरकारमधील आपसातील पराकोटीच्या द्वेषामुळे दिल्लीचे 'गॅस चेंबर' झाले आहे. इथल्या सव्वादोन कोटी लोकांना दररोज विषारी हवा घ्यावी लागते. त्यातले असंख्य लोक मृत्यूच्या दाढेत जातील. जीवघेण्या प्रदूषणाविरोधात आज जनआंदोलन उभारले गेले नाही, तर उद्याच्या पिढ्यांना त्याची किंमत मोजावी लागेल.दिल्लीतील प्रदूषणावर गंभीर मंथनाचा हा काळ आहे. दरवर्षी नोव्हेंबर ते जानेवारीपर्यंत चालणाऱ्या प्रदूषणाच्या तिमाही परीक्षेला सगळ्यांनाच सामोरे जावे लागते. जागतिक आरोग्य संघटनेने दिल्लीत गर्भपात, तणाव व मानसिक आजारपणात वाढ झाल्याचे नोंदवले आहे. याआधी प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा बंद करायची वेळ डिसेंबर, जानेवारीमध्ये यायची. यावेळी महिनाभर आधीच दिल्लीच्या प्रदूषणाने रौद्र रूप दाखवले आहे.मागचा आठवडा दिल्लीतील वायू गुणवत्ता निर्देशांक ५०० ते ९९०पर्यंत आहे. ही आरोग्यासाठी अतिधोकादायक श्रेणी आहे. दिल्लीला घेरलेल्या हरयाणा, पंजाब, राजस्थान, उत्तरप्रदेश या राज्यात धानाची पराळी जाळल्यामुळे हे प्रदूषण वाढत असल्याचे निष्कर्ष आहेत. या राज्यांमध्ये भाजप, काँग्रेस आणि आम आदमी पार्टीचे सरकार आहे. प्रदूषणावर तोडगा काढण्यापेक्षा आपसातील कट-कारस्थानात त्यांचा वेळ निघून जातो. त्यात केंद्राच्या निष्क्रियतेची भर पडली आहे.पंजाब आणि हरयाणा या राज्यात पराळी जाळण्यात येतात. त्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. प्रश्न शेतकऱ्यांचा असल्याने त्यातही मतांचे राजकारण आडवे येते. दाखवण्यापुरते गुन्हे नोंदविले जातात. पुढे काहीच होत नाही. याच आठवड्यात दिवाळी आहे. दिल्लीत फटाके फोडायला आणि विकायला बंदी आहे. परंतु केजरीवाल सरकार हिंदूंच्याच आनंदोत्सवावर विरजण घालतात, म्हणून पुन्हा जोरात फटाके उडविले जातात. धर्म आडवा आणणाऱ्या राजकारण्यांना सर्वसामान्य जनतेने आडवे करायची ही वेळ आहे.या आठवड्यात जे अहवाल आलेत, त्यात हवेतील प्रदूषण हे किमान ३० सिगारेटच्या धुरापेक्षा अधिक आहे. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत कोणीही यातून सुटू शकत नाही. धुरक्यामुळे दिवसाही कमी दृश्यमानतेचा सामना दिल्लीकरांना करावा लागतो आहे. २.५ मायक्रोमीटरपेक्षा कमी व्यासाचे प्रदूषक कण फुफ्फुसात आणि रक्तप्रवाहात प्रवेश करतात, त्यामुळे सर्वात गंभीर परिणाम फुफ्फुस आणि हृदयावर होतात. दिल्लीतील हजारो लोक खोकला आणि श्वसननलिकेच्या आजाराने ग्रस्त आहेत.दिल्ली प्रदूषणमुक्त करण्यासाठी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी कनॉट प्लेसमध्ये अमेरिकेचे संशोधन असलेला देशातील पहिला 'स्मॉग टॉवर' लावला. त्यालाही आता दोन वर्षे झाली. हा टॉवर बंद आहे. बंद पडण्याचा संबंध राज्य सरकारचे अधिकार नायब राज्यपालांकडे असल्याशी जोडण्यात येत आहे. या स्मॉग टॉवरची उंची जमिनीपासून २४.२ मीटर आहे. स्मॉग टॉवरचे क्षेत्रफळ ७८४.५ चौरस मीटर आहे. आरसीसी आणि स्टील स्ट्रक्चरच्या बनलेल्या या टॉवरला ४० पंखे आहेत. ९६० आरपीएम पंख्याची गती असेल.फॅनचा आउटलेट वेग १६.१ मीटर प्रतिसेकंद आहे. फिल्टरची संख्या पाच हजार आहे. ईएसएसची क्षमता १२५० केव्हीए आहे. २५ क्यूबिक मीटर प्रतिसेकंद हवेचा प्रवाही दर असलेला हा पहिलाच प्रयत्न होणार होता. एक किलोमीटरच्या परिघातील हवा खेचण्याची आणि खाली बसवलेल्या पंख्यांमधून एक हजार घनमीटर प्रतिसेकंद शुद्ध हवा बाहेर फेकण्याची क्षमता आहे. आयआयटी दिल्ली आणि आयआयटी मुंबईचे तज्ज्ञ या डेटाचे विश्लेषण करणार होते.हा प्रयोग प्रभावी ठरला, तर असे 'स्मॉग टॉवर' संपूर्ण दिल्लीत बसवण्याची योजना होती. या एकाच टॉवरसाठी दिल्ली सरकारने २३.६३ कोटी रुपये खर्च केले. परंतु केवळ दोन कोटी रुपये न भरल्याने हा टॉवर बंद आहे. स्मॉग टॉवर सुरू करण्यात केंद्र सरकारचा अडसर असल्याचा आरोप दिल्लीचे पर्यावरण मंत्री गोपाल राय करीत आहे. या दोघांच्याही राजकारणाचा सूड दिल्लीकरांवर उगवल्या जातो, हे दृष्टीआड करायचे का?संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला देशभरातील खासदार दिल्लीत असतात. त्या सगळ्यांनाच प्रदूषणाचा सामना करावा लागतो. तेव्हा खासदारांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव होते. मग प्रदूषणावर सरकारला हमखास प्रश्न विचारला जातो. सरकारकडे यादी तयारच आहे. दिल्लीचे नाव कायम पहिल्या क्रमांकावर असते. सोबत देशातील सव्वाशे शहरांची नावे दिली जातात. त्यात उत्तरप्रदेशमध्ये १६, पश्चिम बंगालमध्ये सात, उत्तराखंड तीन, मध्यप्रदेश सहा, पंजाब नऊ, गुजरात तीन, आंध्र प्रदेशातील १३ शहरांची नावे हमखास असतातच. महाराष्ट्रात विषारी शहरांच्या यादीत चंद्रपूर, पुणे, अकोला, अमरावती, औरंगाबाद, जळगाव, जालना, कोल्हापूर, लातुर, मुंबई, नवी मुंबई, नाशिक, नागपूर, सांगली, सोलापूर, ठाणे, उल्हासनगर आदींचा समावेश असतो.'राष्ट्रीय स्वच्छ वायु कार्यक्रम' ही राष्ट्रीय स्तरावरील रणनीती आहे, जी केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने २०१९ मध्ये सुरू केली. 'नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम'ने देशभरातील १३२ देखभाल न करणारी शहरे ओळखली आहेत. परंतु इथे कोणत्याही सुधारणा झाल्या नाहीत. केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी हे प्रदूषणाविषयी अत्यंत संवेदनशील आहेत. त्यांनी वाहनांना प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (पीयूसी) नसल्यास १० हजार रुपये दंड, सहा महिने तुरुंगवास अशा कठोर तरतुदी समाविष्ट केल्या आहेत. हे आदेश आल्यानंतर गडकरींच्या दिल्लीतील खासगी वाहनाचे पीयूसी प्रमाणपत्र एकाच दिवशी पुणे, नागपूर आणि चंद्रपूर येथून काढण्यात आले. त्यामुळे गडकरींचा हा कार्यक्रम प्रदूषण कमी करण्याचा की वाहनचालकांवर दंड ठोठावून खिसे कापण्याचा होता, अशी टीका झाली.दिल्लीत वाहनांच्या प्रदूषणाचीही भर पडते. राजाश्रयाने उद्योगाचे अशुद्ध पाणी थेट यमुनेमध्ये सोडले जाते. याआधी सर्वोच्च न्यायालयाने प्रदूषणावर नियंत्रण मिळविण्यात अपयशी ठरल्याबद्दल दिल्लीसह पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेश सरकारला नागरिकांची नुकसान भरपाई करण्याची तंबी दिली. ''सर्वसामान्य नागरिकांच्या आयुष्याशी असा खेळ तुम्ही कसा काय करू शकता? हे अंतर्गत युद्धापेक्षाही भयंकर नाही का,'' असा संतप्त सवाल करून,''त्यापेक्षा विस्फोटके टाकून सर्वांना मारून टाका'', या शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने पंजाब व हरियाणा सरकारला फटकारले होते. प्रदूषणाचा विळखा भारतालाच आहे असे नाही. अन्य देशांपुढेही हा विषय आहे. परंतु त्यांच्याकडे कालबद्ध कृतिकार्यक्रम असतो. पॅरिसमध्ये आठवड्याच्या शेवटी खासगी कार चालविण्यास बंदी घालण्यात आली होती. 'ऑड-इव्हन'चा प्रयोग करण्यात आला. सार्वजनिक वाहतूक मोफत करण्यात आली.नेदरलँडमध्ये पेट्रोल आणि डिझेलच्या कार विकण्यावर बंदी घातली गेली. २०२५ पर्यंत इलेक्ट्रिक हायड्रोजनच्या गाड्या चालवण्याचा फतवा आहे. जर्मनीमध्ये फ्रिबर्ग शहरात अत्यंत स्वस्त सार्वजनिक वाहतूक उपलब्ध करून देण्यात आली आहे. कोपेनहेगमध्ये कारपेक्षा सायकलला अधिक महत्त्व दिले गेले. भारतात आणि विशेषत: दिल्लीत हे का होऊ शकत नाही?दिल्लीत माणसांची गर्दी झाली आहे. नोकरीसाठी दिल्लीत येणाऱ्यांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. आत्ताच मोठे जनआंदोलन सर्वांच्या सहभागाने उभे राहिले तरच काहीतरी बदल घडण्याची आशा आहे.

# प्राध्यापकाची भूमिका ही वाढप्याची आहे-डॉ.संजय कवीश्वर



**नागपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, मराठी प्राध्यापक परिषद, तायवाडे कॉलेज, महादुला- कोराडी व धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय विद्यापीठस्तरीय चर्चासत्र राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि मराठीचा अभ्यासक्रम या विषयावर नागपूर येथील धनवटे नॅशनल कॉलेजच्या मातोश्री विमलाताई देशमुख सभागृहात नुकतेच संपन्न झाले. याप्रसंगी अध्यक्षस्थानी मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष डॉ.गणेश मोहोड, उद्घाटक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, प्रमुख अतिथी धनवटे नॅशनल कॉलेजचे प्राचार्य डॉ. ओमराज देशमुख, तायवाडे कॉलेज महादुला-कोराडी येथील प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे, मराठी प्राध्यापक परिषदेचे सचिव डॉ. राजेंद्र वाटाणे, धनवटे नॅशनल कॉलेजच्या मराठी विभाग प्रमुख डॉ. भारती खापेकर प्रामुख्याने व्यासपीठावर उपस्थित होते.

या उद्घाटन प्रसंगी डॉ. संजय कवीश्वर यांनी तरुण विद्यार्थ्यांमध्ये असणारी ऊर्जा योग्य प्रकारे कामात यावी या उद्देशाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण निर्माण झाले असून विद्यार्थ्याला स्वतःहून काय शिकायचे आहे याचे स्वातंत्र्य या शैक्षणिक धोरणात दिलेले आहे. तेव्हा या धोरणाकडे सकारात्मकतेने पहावे याची जाणीव करून देत नवीन शैक्षणिक धोरणात अनेक गोष्टी आहेत त्या प्राध्यापकाने विद्यार्थ्यांच्या ताटात कशा वाढायच्या हे त्या त्या विषयाच्या शिक्षकावर अवलंबून आहे आणि त्यावरच त्याचे कौशल्य निर्भर राहणार आहे. विविधांगी विकास हा या धोरणाचा उद्देश आहे. भाषेच्या प्राध्यापकांनी भाषेला कौशल्य म्हणून शिकविण्याची आज गरज आहे कौशल्याधारीत शिक्षणानेच विद्यार्थी रोजगाराभिमुख होऊ शकेल याची जाणीव करून डॉ . कवीश्वर यांनी करून दिली.उद्घाटन समारंभाला प्रमुख अतिथी असणारे प्राचार्य डॉ. ओमराज देशमुख यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणातून विषय निवडीच्या बऱ्याच संधी उपलब्ध होणार असून त्याच्या कलागुणांना वाव मिळण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कसे उपयुक्त आहे याची जाणीव करून देत मराठी प्राध्यापक परिषद असे विविधांगी उपक्रम राबवत असल्याचे समाधान व्यक्त केले. यावेळी प्रमुख अतिथी असणाऱ्या प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे यांनी यापूर्वी देखील शैक्षणिक धोरण आखण्यात आले होते तेव्हा त्यातही काही उणीवा होत्या परंतु त्यात प्रसंगानुरूप बदल करण्यात आला. कोणतेही धोरण अमलात आणताना अनेक अडचणी निर्माण होतात तेव्हा त्यांना जाणून घेत त्या सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे सांगितले . प्रवेशापासून तर परीक्षेपर्यंत अनेक आव्हानांचा प्राध्यापकांना सामना करावा लागणार आहे. तेव्हा कुठल्याही गोष्टींकडे सकारात्मकतेने बघून त्यात कशाप्रकारे विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करता येईल याचा प्रयत्न करायला हवा याची जाणीव करून दिली. मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष डॉ. गणेश मोहोड मार्गदर्शन करताना म्हणाले, शासनाने अनेक गोष्टी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आपल्याला दिलेल्या आहेत. त्यापैकी काही सकारात्मक तर काही नकारात्मक आहे. तेव्हा आपल्यापुढे निश्चितच एक आव्हान उभे ठाकले असून त्या आव्हानाला सामोरे जाऊन येणारा काळ आनंदी कसा करता येईल याचा प्रयत्न प्राध्यापकांनी करण्याची गरज आहे. शिवाय आपल्या विषयाचे महत्त्व वाढविण्याच्या दृष्टीनेही प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून त्यात नवनवीन कौशल्याची भर घलणे गरजेचे आहे याची जाणीव करून दिली.याप्रसंगी प्रास्ताविक व मान्यवर अतिथींचा परिचय करून देताना डॉ. राजेंद्र वाटाणे यांनी मराठी प्राध्यापक परिषदेच्या पंचावन्न वर्षाच्या उत्कर्षाचा आलेख अधोरेखित करून परिषदेने मराठी प्राध्यापकांच्या ध्येय -धोरणासंदर्भात सातत्याने कसा पुढाकार घेऊन प्राध्यापकांचे हीत जोपासण्याचा प्रयत्न केला याची जाणीव करून दिली. शिवाय राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मराठी विषयाच्या अनुषंगाने कसे बदल झाले आहे व त्याचे निराकरण करण्यासाठी सदर चर्चासत्र कसे महत्त्वपूर्ण ठरणारे आहे याची जाणीव करून दिली. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनिषा नागपुरे, आभारप्रदर्शन डॉ. भारती खापेकर यांनी केले. या कार्यक्रमाला मराठी प्राध्यापक परिषदेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. श्रीकांत नाकाडे, परिषदेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. हिराजी बनपूरकर, डॉ. परमानंद बावणकुळे, डॉ. राकेश कभे, डॉ. कोमल ठाकरे, डॉ. राजू गोसावी, डॉ. संजय लाटेलवार, डॉ. राजेंद्र नाईकवाडे, डॉ. अजय कुळकर्णी, डॉ. शैलेंद्र लेंडे, डॉ . गैरवार , डॉ. विजय राऊत, डॉ. अशोक भक्ते, डॉ. सुशील मेश्राम, डॉ. अंजली पांडे, डॉ. देवयानी चव्हाण तसेच विविध महाविद्यालयातील शेकडो प्राध्यापक व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते.

# मौजा चंदनखेडा येथे दिवंगत खासदार महोदयांच्या स्मुर्ती पित्यर्थ विविध कार्यक्रमाचे आयोजन



**भद्रावती । प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजा चंदनखेडा येथे दिवंगत खासदार मा. बाळूभाऊ स्मुर्ती पित्यर्थ छत्रपती क्रीडा मंडळ द्वारा आयोजित सामाजिक कार्यकर्ते सुधिर मुडेवार यांच्या मुख्य संकल्पनेतून आणि ग्राम पंचायत चंदनखेडा यांच्या सहकार्यातून दिनांक ०५ नोव्हेबर २०२३ ते ०८ नोव्हेबर २०२३ या कालावधीत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. चंद्रपूर - वाणी, आर्णी क्षेत्राचे लोकप्रिय दिवंगत खासदार स्व. बाळुभाऊ धानोरकर स्मुर्ती पित्यर्थ चंदनखेडा येथे दिनांक ०५ नोव्हेबर २०२३ रोजी सकाळी ०६. ०० वाजता ग्राम स्वच्छता त्यानंतर सकाळी ठीक ०८.०० वाजता प्रस्तावित नवीन क्रीडा संकुलन येथे फळबाग वृक्षा रोपण घेण्यात आले.त्यानंतर सकाळी ठीक १०.०० मान्यवरांचे हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन या उद्घाटनीय कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून अनिल धानोरकर माजी नगराध्यक्ष भद्रावती, सहउद्घाटक सुधीर मुडेवार सामाजिक कार्यकर्ता चंदनखेडा, अध्यक्ष नयन जांभुळे सरपंच ग्रामपंचायत चंदनखेडा, प्रमुख अतिथी अनिल चौधरी संचालक कृ.उ.बा.स. भद्रावती, सुमित मुडेवार उपसभापती आ.वि.से.सह.संस्था चंदनखेडा, डॉ. शाहीन सय्यद वैद्यकीय अधिकारी चंदनखेडा, डॉ. देवाशिष ससाणे वैद्यकीय अधिकारी चंदनखेडा हे उपस्थित होते.उद्घाटनीय कार्यक्रमा नंतर भव्य महा रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये ५१ रकतदात्यांनी रक्तदान केले.सायंकाळी ०७.०० वाजता जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या क्रीडांगनावर पुरुष व महिलांचे कबड्डी सामण्याचे उद्घाटन व रक्तदात्यांचा सत्कार प्रतिभा.धानोरकर आमदार वरोरा भाद्रवती विधानसभा क्षेत्र यांच्या हस्ते करण्यात आला .या कर्यक्रमाला उद्घाटक सुधीरमुडेवार सामाजिक कार्यकर्ता चंदनखेडा, अध्यक्ष प्रशांत काळे तालुका अध्यक्ष तथा माजी अध्यक्ष संजयगांधी निराधार योजना भद्रावती, प्रमुख अतिथी नयनजांभुळे सरपंच ग्रामपंचायत चंदनखेडा सुमित मुदेवार उपसभापती आ. वी.से.सह सोसा. चंदू दानव , ईश्वर पा. धांडे ,सलाम शेख हे उपस्थित होते .

रात्रो ठीक ०९.०० वाजता सामाजिक सांस्कृतिक प्रबोधनात्मक कार्यक्रम सादरकर्ते लोकरंग नाट्य कला संगीतमय प्रबोधन मंच भद्रावती. द्वारा सादर करण्यात आले त्यामध्ये भरपूर प्रमाणात ग्रामवसी हजर होते .तसेच दिनांक ०६ नोव्हेबर रोजी सकाळी ठीक ०७.०० वाजता प्लास्टिक संकलन त्यानंतर सकाळी ठीक ०९.०० वाजता खुली रांगोळी स्पर्धा, सकाळी ठीक ०९.३० वाजता पाक कला स्पर्धा घेण्यात आली.त्या नंतर सकाळी ठीक १०.०० वाजता जिल्हा परिषद शाळा परिसरात भव्य रोगनिदान माहाशिबीर आयोजन करण्यात आले शिबिरात निशुल्क रोगनिदान व उपचार करण्यात आले त्यात मेडिसिन तज्ञ , नेत्रोग तज्ञ, सर्जरी तज्ञ, बालरोग तज्ञ, स्त्रीरोग तज्ञ, नाक कान घसा तज्ञ, अस्थिरोग तज्ञ, त्वचा रोग तज्ञ, श्वसन रोग तज्ञ, ह्वदय रोग तज्ञ, मानसिक रोग तज्ञ, दंत व मुखरोग तज्ञ, युरो तज्ञ तपासणी करीता आले होते या शिबिराचे वैशिष्टे शिबीर स्थळावर नोंदणी मोफत, तज्ञ डॉक्टरकडून तपासणी मोफत, भरती रुग्णांना सर्व सामान्य चाचण्या एक्स-रे, रक्त,लघवी,चाचणी सोनोग्राफी तसेच अतिविशिष्ठ चाचण्या सि.टी.स्क्यान, एम.आर.आय. इत्यादी चाचण्या आवश्यकातेनुसार व डॉक्टर च्या सल्यानुसार, भरती रुग्णांना खाट शुल्क, जेवण मोफत, ह्दय रोग तपासणी हि तज्ञ डॉक्टरकडून इसीजी मशीनद्वारे करण्यात आली. दुपारी २ .०० वाजता हळदी कुंकू कार्यक्रम व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आले असुन या कार्यक्रमा करीता शैक्षणिक मार्गदर्शन वर्षाताई धानोरकर प्राचार्य फेयरीलन्ड स्कूल भद्रावती, महिला आरोग्य मार्गदर्शन डॉ .महिला साक्षीकरण मार्गदर्शन सुनिता खंडाळकर सामाजीक कार्यकर्त्या भद्रावती व प्रमुख उपस्थिती स्नेहलताई मुडेवार, सौ. भारती उरकांडे, मुक्ताताई सोनुले, प्रतिभादोहतरे, मनीषा ठावरी, रंजना हनवते,. सविता गायकवाड हे उपस्थित होते.त्यामध्ये महिलान करीता संगीत खुर्ची स्पर्धा व महिलां करीता अल्पोहाची व्यवस्था स्नेहलताई मुडेवार यांचे कडून करण्यात आली साय. ८.०० वाजता पुरुष कबड्डी सामने सुरू करण्यात आले. दिनांक ०७ नोव्हेबर २०२३ रोजी सकाळी ०८.०० वाजता मरेथान स्पर्धा व सकाळी ०९.०० वाजता पुरुष व महिलांचे कबड्डी सामने आणि दिनांक ०८ नोव्हेबर २०२३ रोजी सकाळी ०७.०० वाजता समारोपीय कार्यक्रम या कार्यक्रमाचे उद्घाटक प्रशांत काळे तालुका अध्यक्ष तथा माजी अध्यक्ष संजयगांधी निराधार योजना भद्रावती, सहउद्घाटक नयन जांभुळे सरपंच ग्रामपंचायत चंदनखेडा, अध्यक्ष सुधीरमुडेवार सामाजिक कार्यकर्ता चंदनखेडा , विशेष अतिथी चंद्रकांत दानव, अनिल चौधरी, सुमित मुडेवार उपसभापती आ. वि. से. सह.संस्था चंदनखेडा,भानुदास गायकवाड, ईश्वर धांडे, जगदीश बोढे, गुलाब भरडे, भारती उरकांडे उपसरपंच ग्रा. प. चंदनखेडा हे आहे. या सगळ्या कार्यक्रमा करीता विशेष सहकार्य ग्रामपंचायत चंदनखेडा, पंचशील बौध्द मंडळ, महात्मा फुले समाज सुधारक मंडळ, संत गोरोबा काका समाज मंडळ, आदिवाशी माना जमात समाज संगठन, गुरुदेव सेवा मंडळ व समस्त ग्रामवासी यांचे आहे .

# जाती-जातींमध्ये संभ्रम निर्माण करू नये-मंत्री शंभूराज देसाई



**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे जम्मू काश्मिरच्या दौऱ्यावर गेलेले असताना राज्यात दोन मंत्र्यांमध्ये वादाची ठिणगी पडल्याचे दिसून आले. मंत्री छगन भुजबळ यांनी सरकारमध्ये असताना देखील सरकारवर आक्षेप घेतले आहेत. मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसींवर अन्याय होत असल्याचे छगन भुजबळ म्हणाले होते. यावर आता मंत्री शंभूराज देसाई यांनी आक्षेप घेतला आहे.भुजबळ यांच्या विरोधात आक्रमक भूमिका घेत ओबीसींवर अन्याय होणार नाही, याचा विचार सरकारने केला असल्याचे शंभूराज देसाई यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर भुजबळ यांचे कालचे विधान आश्चर्यकारक असल्याचेही मंत्री शंभूराज देसाई यांनी म्हटले आहे.मराठा समाजाच्या आरक्षणाच्या आंदोलनादरम्यान बीडमध्ये मोठ्या प्रमाणात हिंसाचार झाल्याचे दिसून आले. या घटनेत दोन आमदारांची घरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यालय आणि एका हॉटेलवर हल्ला झाला होता. या घटनेतील परिस्थितीची पाहणी करण्यासाठी मंत्री छगन भुजबळ यांनी बीड जिल्ह्याचा दौरा केला. या संदर्भात बोलताना छगन भुजबळ यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि सरकारवर गंभीर आरोप केले. इतकेच नाही तर ओबीसी समाजाला या आरक्षणाच्या निर्णयाविरोधात रस्त्यावर उतरण्याचे आवाहन केले. भुजबळ यांच्या या वक्तव्यावर मंत्री शंभूराज देसाई यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.मंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, भुजबळांनी आक्षेप घेतला की माजी न्यायमूर्ती गायकवाड हे आंतरवालीमध्ये कसे गेले, त्यांनी तिथे सर.. सर केले. मात्र, तसे काहीही नाही. सरकारने सांगितल्यानंतरच दोन्ही माजी न्यायमूर्ती तिथे गेले होते. भुजबळांनी ओबीसींमध्ये गैरसमज निर्माण करू नये.शंभूराज देसाई म्हणाले की, महाराष्ट्रामध्ये जाती-जातींमध्ये संभ्रम निर्माण होईल, असे विधान भुजबळांनी करणे चुकीचे आहे. यामुळे राज्यात परिस्थिती खराब होऊ शकते. आम्ही आमची भूमिका मुख्यमंत्र्यांसमोर मांडणार आहोत. कदाचित उद्याच मंत्रिमंडळाची बैठक होईल, त्यामध्ये आम्ही चर्चा करू. जबाबदार आणि वरिष्ठ मंत्र्याचे हे वक्तव्य आश्चर्यकारक आहे. कुणाच्याही आरक्षणाला धक्का न लावता हे आरक्षण देण्याचे सरकारने ठरवले आहे. मंत्रिमंडळात तशी चर्चा झाली होती.'

# पुण्यात किरकोळ वादातून तरुणावर जीवघेणा हल्ला

**पुणे**-एकमेकांचे ओळखीचे तरुणाने एकाजणाकडून फोन करण्यासाठी फोन घेतला. परंतु सदर मोबाईल फोन आरोपी परत करत नसल्याने त्यांचे हातातून तरुणाने फोन परत घेत असल्याचे रागातून ३ जणांनी संबंधित तरुणाला बेदम मारहाण करुन त्याच्यावर हल्ल करुन त्याला गंभीर जखमी केल्याचा प्रकार घडला आहे.याप्रकरणी वैभव तरंगे (रा.उरळीकांचन,पुणे) व त्याच्या दोन अनोळखी साथीदारांवर लोणी काळभोर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी मोहम्मद फिरोज मोहम्मद शरीफ सलमानी (वय-२५,रा.उरळीकांचन,पुणे) याने आरोपी विरोधात पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार व आरोपी हे एकमेकांचे ओळखीचे आहे.मोहम्मद फिरोज याचा मोबाईल आरोपी वैभव तरंगे याने फोन करण्यासाठी घेतला होता. परंतु तो परत देत नसल्यामुळे मोहम्मद याने त्याचे हातातून मोबाईल घेतला. त्यामुळे त्याचा राग आल्यामुळे आरोपीने मोहम्मद याचे रुमचे दरवाजावर लाथा मारुन दरवाजा तोडला. त्यानंतर रुमचे बाहेर त्याला ओढून घेत त्याला साथीदारांचे मदतीने बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. तक्रारदारचा भाऊ मोहम्मद फरीद हा भावाला वाचविण्यासाठी आल्याने त्याचे भावाचे डोक्यात त्यास जीवे ठार मारण्याचे उद्देशाने प्लायवुडची चौकनी फळी मारुन गंभीर जखमी केले. तसेच तक्रारदार यास देखील मारहाण करुन जखमी करण्यात आले. 'आम्ही इथले भाई आहे, कोणी ही आमच्यामध्ये यायचे नाही, कोणी आले तर त्याचा पण कार्यक्रम करु' असे म्हणून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सदर आरोपी हा पोलिस रेकॉर्डवरील असून याबाबत पुढील तपास लोणीकाळभोर पोलिस करत आहे.

# नवे शैक्षणिक धोरण व मराठी या विषयावर चर्चासत्र संपन्न

## नागपूर येथे मराठी प्राध्यापक परिषदेचे यशस्वी आयोजन





**नागपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर आणि गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली मराठी प्राध्यापक परिषद आयोजित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व मराठीचा अभ्यासक्रम या विषयावरील एकदिवसीय विद्यापीठस्तरीय चर्चासत्र तायवाडे महाविद्यालय कोराडी व धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. चर्चासत्राच्या द्वितीय सत्रात 'पदवी पातळीवरील मराठीचा अभ्यासक्रम ' या विषयावर डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद आयोजित करण्यात आला. यावेळी डॉ. अजय कुळकर्णी यांनी वाणिज्य व विज्ञान शाखेतील मराठीच्या अभ्याक्रमासंदर्भात माहिती दिली. नवीन शैक्षणिक धोरणानुसार बी. कॉम. प्रथम सत्र व चवथे सत्र यांना मराठी विषय राहणार असून त्यामुळे तासिका कमी होण्याचा धोका असला तरी कौशल्यविकासासाठी तीस तासिका मिळणार असल्याने अतिरिक्त होण्याची वेळ प्राध्यापकांवर येणार नाही. शिवाय बी.एस्सी. च्या अभ्यासक्रमात कुठलाही बदल नसल्याने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हितावह ठरणार असल्याचे सांगितले. डॉ. संजय लाटेलवार यांनी गोंडवाना विद्यापीठाने अजून कुठलाही अभ्यासक्रम तयार केला नसल्याने नागपूर विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाचा आराखडा नजरेपुढे ठेवून नवीन अभ्यासक्रम करणे संयुक्तिक ठरेल असे मत व्यक्त केले. डॉ. देवयानी चव्हाण यांनी जी.एस. कॉलेजने २०२३-२४ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार मराठीचा अभ्यासक्रम तयार केला असून त्यात तासिका कमी झाल्या परंतु इतर पुरक विषय शिकविण्यासाठी दिल्याने मराठी विषयाचे पद कायम असल्याचे सांगितले. डॉ . राजेंद्र नाईकवाडे यांनी बी.ए.च्या अभ्यासक्रमाविषयी सांगताना आवश्यक मराठी व ऐच्छिक मराठी असे दोन्ही विषय अभ्यासक्रमात समाविष्ट असल्याने प्राध्यापकांवर अतिरिक्त होण्याची वेळ येणार नाही याची जाणीव करून दिली. सूत्रसंचालन डॉ. पद्मिनी घोसेकर, आभारप्रदर्शन डॉ. संगीता खुर्द यांनी केले.तिसऱ्या सत्राचे व समारोपाचे अध्यक्ष राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ पदव्युत्तर विभागप्रमुख डॉ.शैलेंद्र लेंडे होते. यावेळी 'पदव्युत्तर पातळीवरील मराठीचा अभ्यासक्रम ' या विषयावर डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांनी अभ्यासक्रमासंदर्भात झालेल्या बदलांची सविस्तर माहिती देऊन ४ क्रेडिट व २ क्रेडिटसाठी असणाऱ्या प्रश्नांचे स्वरूप कौशल्याधारित अभ्यासाचे नियोजन, प्रकल्पाची रचना इ. विषयावर भाष्य केले. डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी एम.ए. मराठीचा अभ्यासक्रम व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या संदर्भात सखोल माहिती देताना क्रेडिट पद्धती व विषयाच्या संदर्भात सांगितले. यावेळी व्यासपीठावर मराठी प्राध्यापक परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. हिराजी बनपूरकर तसेच तायवाडे महाविद्यालय कोराडी येथील प्राचार्य डॉ.शरयू तायवाडे प्रामुख्याने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विजय राऊत, आभारप्रदर्शन डॉ. संजय सिंगनजुडे यांनी मानले. चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष डॉ. गणेश मोहोड, सचिव डॉ. राजेंद्र वाटाणे, कार्याध्यक्ष डॉ. हिराजी बनपूरकर, उपाध्यक्ष डॉ. अजय कुलकर्णी, डॉ. राजेंद्र नाईकवाडे, डॉ. श्रीकांत नाकाडे, डॉ. परमानंद बावनकुळे व इतर पदाधिकारी तसेच डॉ. भारती खापेकर, डॉ. कोमल ठाकरे यांनी विशेष परिश्रम घेतले. चर्चासात्रात दोन्ही विद्यापीठातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाढदिवसाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा









परिवाराची जबाबदारी किसनरावांवर आली. घरात दोन भाऊ, दोन बहिणी, आई यांचा सांभाळ करण्यासाठी त्यांना मिल्ट्रीची नोकरी सोडावी लागली. मिल्ट्रीत जाण्यापूर्वी त्यांनी फिटर या ट्रेडमध्ये आयटीआयचा अभ्यासक्रम पूर्ण केला होता. आयटीआय पास झाल्यानंतर त्यांनी हैदराबाद येथे सिटीआय हा प्रशिक्षकाचा अभ्यासक्रम पूर्ण केला. त्या शिक्षणाचा फायदा झाला.१९९६ मध्ये त्यांना उमरेड कोळसा खदानीत नोकरी लागली. पुढे १९९७ मध्ये कंपनीने त्यांना नोकरीतून काढून टाकले. परिवाराची आर्थिक गरज भागविण्यासाठी त्यांना भद्रावती येथील प्रियदर्शनी आयटीआयमध्ये आणि काही काळ शासकीय आयटीआयमध्ये प्रशिक्षकाची नोकरी स्वीकारावी लागली तीही अल्पकालीन ठरली. पोटाची खळगी भरण्यासाठी वणी माजरी वेकोली क्षेत्रात कोळशाचे ट्रक ड्रायव्हर म्हणून काही काळ काम करावे लागले.१९९९ मध्ये जुनाड वेकोली ओपनकास्टमध्ये त्यांना नोकरी लागली. तीन वर्षांच्या ट्रेनिंग काळात त्यांना फिटर ऑपरेटर, मायनिंग सरदार सह अनेक जबाबदाऱ्या अतिशय अल्प पगारात पार पाडाव्या लागल्या.तेथील आर्थिक शोषण सहन न झाल्याने या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. यानिमित्ताने भारतीय जनता पक्षाचे तत्कालीन खासदार हंसराज अहिर यांच्या संपर्कात आले. हंसराज भैय्यांसोबत यांच्याशी त्यांचा संपर्क वृध्दिंगत होत गेला. सलगी वाढली. हंसराज भैय्या यांनी मोलाची मदत केली. आज ते खासदार हंसराजभैय्या यांचे खास विश्वासू सहकारी म्हणून सर्वज्ञात आहे. दरम्यान एकीकडे नोकरीचा संघर्ष सुरू असतानाच घरात त्यांचे विवाहकार्याची बोलणी सुरू झाली. २००४ मध्ये त्यांचे जळका येथील प्रतिष्ठित शेतकरी श्री. शंकरराव श्रीहरी सोनटक्के यांची कन्या विद्या या स्वरूप तरुणीशी विवाह झाला. तीचे शिक्षण १२ वी पर्यंत झाले होते. संसार सुरळीत सुरू होता. दुर्दैवाने लग्नानंतर पुन्हा रोजगारातून मुक्त होण्याची पाळी आली. रोजगार हिरावला गेला. जळका येथे सासरवाडीला शेती होती. ती सांभाळण्यासाठी सासऱ्यांना मुलगा नव्हता. एकुलती एक मुलगीच होती. काहीकाळ सासरवाडीची शेती सांभाळली. लग्नानंतर पुढे काही दिवसांनी वेकोलीत नोकरी मिळाली. या नोकरीत स्थैर्य लाभले.तेथे आजतागायत क्लर्क या पदावर कार्यरत आहे.जीवन जगण्याच्या भाऊगर्दीत दरम्यानच्या कालावधीमध्ये त्यांची शिक्षणाची इच्छा अपूर्णच राहिली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर होताच. आपणही शिकून मोठे व्हावे ही भावना जागृत झाली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची विचारधारा पाठीशी होतीच. त्यातून आपण काहीतरी शिकलो पाहिजे. शिकून नांव कमवले पाहिजे. मोठे झालो पाहिजे असे त्यांना वाटायचे. ज्ञानलालसा शांत बसू देईना. त्यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून बीए ची पदवी परीक्षा उत्तीर्ण केली. बीए नंतर पुढे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून त्यांनी समाजशास्त्र विषयात एम ए ची परीक्षा पास केली. समाजशास्त्र या विषयात त्यांनी पीएच डी करून डॉक्टरेट मिळविली. यावेळी गरिबांची दशा आणि दिशा या विषयावर त्यांनी आचार्य पदवीसाठी विद्यापिठात प्रबंध सादर केला. मार्गदर्शक म्हणून भद्रावती येथील प्राचार्य डॉ .केशवराव ठेंगणे व वरोरा येथील मुख्याध्यापक विठ्ठलराव सोनेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.दरम्यानच्या कालावधी त्यांनी आपले लक्ष सामाजिक कार्याकडे वळविले. सामाजिक कार्य करत असताना हंसराज भैय्यांच्या संपर्कात आल्यानंतर ते राजकारणाकडे वळले. हंसराज भैय्याचे विश्वासू सहकारी म्हणून काम करत असताना त्यांची वरोरा भारतीय जनता पक्षाच्या तालुका महासचिव पदी नियुक्ती करण्यात आली. पुढे त्यांची ही घोडदौड विविध क्षेत्रात सुरूच राहिली. समाजसेवेचा चौफेर व्याप वाढला.ओबीसी चंद्रपूर जिल्हा उपाध्यक्ष, केंद्रीय मानवाधिकार संघटनेचे विदर्भ अध्यक्ष, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चंद्रपूर जिल्हा प्रचारक, ग्रामगीता सक्रिय दर्शन मंदिर पंढरपूर येथे अध्यक्ष, पतंजली सेवा समिती जिल्हा सचिव,लन थिलक कराटे स्कूल ऑफ इंटरनॅशनल जिल्हाध्यक्ष चंद्रपूर, श्री गुरुदेव व्यायाम शाळा वरोरा आनंदवन अध्यक्ष अशा विविध पदांच्या माध्यमातून त्यांचे सेवा कार्य सुरू आहे.दरम्यानच्या कालावधीत त्यांच्या वडिलांची इच्छा होते की, आपला मुलगा कलेक्टर व्हावा. त्यांने प्रशासकीय सेवेत जावे .परंतु घरातील गरीबी आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे त्यांना वडिलांची ही इच्छा पूर्ण करता आली नाही. वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी आपली मोठी मुलगी कु. तेजस्विनी हिला पुणे येथे यूपीएससी शिक्षणासाठी पाठवले आहे. छोटी मुलगी कु. अश्विनी इयत्ता दहावीत शिकत असून ती उत्कृष्ट गायिका आहे. शैक्षणिक क्षेत्रातील स्वप्ने आपल्याला पूर्ण करता आली नाही ती आपल्या मुलींनी पूर्ण करावी यासाठी अंकुशराव त्यांना सर्वतोपरी सहकार्य व मार्गदर्शन करत आहेत. अंकुशरावांना समाजकार्यात विशेष आवड असल्याने त्यांनी आपले आयुष्य समाजसेवेसाठी वाहून टाकले आहे. त्यासाठी ते स्वतः आर्थिक पदरमोड करून सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करतात. आतापर्यंत जवळजवळ ९६ गावात त्यांनी हागणदारीमुक्त रथयात्रा फिरविली असून ४० गावांचे हागणदारीमुक्त झाल्याचे प्रमाणपत्र तत्कालीन बिडिओ ने त्यांना दिले आहे. रक्ताला जात नसते, धर्म नसतो. रक्त हे जीवन आहे ही गरज ओळखून स्वतः ४२ वेळा त्यांनी रक्तदान करून गरजू रक्तदात्यांची रक्ताची गरज भागवली आहे. संपूर्ण जग कोरोना नामक महामारीच्या सावटामध्ये असताना त्यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता वरोरा आणि भद्रावती तालुक्यातील जवळजवळ २१० गावात रोटी अभियान चालवून गरीब आणि गरजूंना धान्यकीट वाटप केलेल्या आहे.निव्वळ समाजकारण करून गरिबांना न्याय मिळत नाही. त्यासाठी सत्तेच्या चाव्या आपल्या हातामध्ये असल्या पाहिजे. या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी राजकारणात खासदार हंसराज अहिर यांच्या नेतृत्वात आणि मार्गदर्शनामध्ये काम सुरू केलेले आहे. त्यांच्या मार्गदर्शनात त्यांची राजकीय कामे सुरू आहे.आयुष्यात वाटचाल करत असताना एखादी कोणती आठवण आपल्याला आठवते की जी आपण गर्वाने सांगू शकाल? या प्रश्नावर ते सांगतात की, माझ्या घरची नाजूक परिस्थिती असतानाही माझ्या सासुरवाडीच्या श्रीमंत परिवारातील, घराण्याची पत्नी मला मिळाली ही माझ्यासाठी अतिशय आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे . हंसराजभैय्या यांनी महत्त्वाची साथ आणि मौलिक मार्गदर्शन दिले ही आठवण सांगायला ते विसरत नाही. आज आपण जे काही आहोत ते पत्नी विद्याचे सहकार्य, मार्गदर्शक हंसराज भैय्यांचे मार्गदर्शन आणि वडिलांचे आशीर्वाद यामुळे आपल्या आयुष्याच्या लढाईत यशस्वी होता आले असा त्यांचा विश्वास आहे.खासदार हंसराज अहिर यांच्या मार्गदर्शनात आपण जर निवडणूक जिंकण्यात यशस्वी झालो तर गोरगरिबांची सेवा करणार. गोरगरिबांना न्याय मिळवून देणार.भ्रष्टाचारी नेते व भ्रष्ट अधिकारी यांच्यावर वचक बसविणार. गोरगरिबांच्या मुलांना पुढे जाण्यासाठी तनमनधनाने मदत करण्याचा संकल्पही त्यांनी बोलून दाखवलेला आहे. परिसरात ते जसे दानदाते म्हणून प्रसिद्ध आहेत तसेच ते विदर्भाबाहेरही देणगीदार म्हणून प्रसिद्ध आहेत.सामाजिक कार्यासाठी लागणारा पैशांचा स्त्रोत काय? याबाबत सांगताना ते म्हणतात, वेकोलीमध्ये नोकरी करून जो पैसा मिळतो त्या पैशातून मी माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. पत्नीकडून मिळालेल्या वडिलोपार्जित संपत्तीतुन प्रॉपर्टीचे काम सुरू केले आहे. शासनाच्या नियमानुसार आयकर भरतो. उरलेल्या नफ्यातून समाजातील गरजवंतांच्या, सामाजिक संस्थांच्या मदतीला धावून जातो. त्यांना मदत लागली तर करतो. गरजूंच्या मदतीला जाऊन जाणे हा माझा व माझ्या कुटुंबियांचा स्वभाव आहे. गरजूंच्या चेहऱ्यावरील आनंद बघून आम्हाला समाधान मिळते. डॉ आगलावे यांनी अनेक सामाजिक व धार्मिक संस्थांना सढळ हाताने मदत केलेली आहे. ज्यात साई संस्थान शिर्डी, संत गजानन महाराज संस्थान शेगाव, गुरुकुंज आश्रम मोझरी, पंढरपूर येथील तीर्थस्थळांना मोठ्या प्रमाणात देणग्या दिलेल्या आहे. विशेष म्हणजे त्यांनी गुरुकुंज मोझरी आश्रमाच्या प्रचारार्थ दहा लाखाची कार भेट देऊन गुरूदेवांच्या कामात आपला खारीचा वाटा उचललेला आहे. वरोरा भद्रावती परिसरातही त्यांनी जगन्नाथ महाराज, तुकडोजी महाराज, बिरसा मुंडा, गौतम बुद्ध व गजानन महाराज यांच्या मूर्ती स्थापन करण्यासाठी आर्थिक सहकार्य दिलेले आहे. राष्ट्रीयस्तरावर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चंद्रपूर लोकसभा क्षेत्राचे लाडके खासदार हस्राजभैया अहिर यांच्या कामाचा आदर्श डोळ्यासमोर असल्याने ते दररोज अठरा अठरा तास काम करून आपली स्वप्ने पूर्ण करण्याच्या मार्गात कार्यमग्न आहे. भारत सरकारचे युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयव्दारे नेहरू युवा केंद्र, मुंबई तर्फे डॉ. आगलावे यांना विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल समाजरत्न पुरस्कार २०२३ ने महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल मा.रमेश बैस यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. आज त्यांचा ५२ वा वाढदिवस. या वाढदिवसानिमित्ताने त्यांना समाजकार्य व राष्ट्रकार्यासाठी निरोगी व निरामय आरोग्य लाभो अशी दैनिक सह्याद्रीचा राखणदार परिवारातर्फे शुभेच्छा व्यक्त करतो.

# चाहत्यांचे मनोगत....

## डॉ.अंकुश भाऊ आगलावे एक कर्मठ व्यक्तिमत्व



डॉ .अंकुश भाऊ आगलावे एक कर्मठ व्यक्तिमत्व असून वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांच्यातत्व प्रणाली प्रमाणे आपल्या जीवनात बदल घडवून ग्राम संस्कृतीचा जिव्हाळा /भेद कल्पना जाती रसातळाला/ या वचना प्रमाणे गरीब जनतेचे कार्य सातत्याने करत राहावं हा विचार घेऊन सातत्याने गोरगरिबांची सेवा करणे हा त्यांचा मानस आहे . ग्रामगीता घरोघरी पोहचावी व राष्ट्रसंतांच्या विचारप्रमाणे ऋ ऋगाव हा विश्वाचा नकाशा गावावरून देशाची परीक्षा ऋऋ यातून गाव आणि राष्ट्र उन्नत व्हावा तसेच नविन पिढी ही व्यसनाधीन होत आहेत ते व्यसनमुक्त कसे होतील व सुसंस्कृत पिढी निर्माण कशी करता येईल अशी तळमळ त्यांच्या कार्यातून सातत्याने दिसून येते. एक सामाजिक दातृत्व भूमिका घेऊन अनेक गुरुदेव सेवा मंडळाला भजन साहित्य पुरविणे तसेच वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि विचारवंत ज्ञानी महापुरुषांच्या तसे अनेक पंथाच्या देवताच्या मुर्ती गावागावांमध्ये स्थापित करून नवतरुण पिढीला त्यांचा आदर्श घेता यावा व नव निर्माण बलशाली राष्ट्र तयार व्हावा , वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी माणुस घडविण्याचे सांस्कृतिक पिठ म्हणजे च सामुदायिक प्रार्थना सांगितले ही सामुदायीक प्रार्थना प्रत्येक गावात व्हावी, हिच त्यांची विचारसरणी असुन गुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून त्यांच्या हातून होत आहे . राजकारणा सोबतच समाजकारण आणि समाजकारणातून देश सेवा त्यांच्या हातून होत असतांना मी नेहमीच पाहत असतो . शेतकऱ्याचे प्रश्न असो किंवा मजुरांचे प्रश्न असो आपल्या विचारशील कृतीने सोडविण्याचे प्रयत्न अधिकाऱ्यांमार्फत करून पीडितांना न्याय देण्याचे महान कार्य त्यांच्या हातून होते . कोरोना काळामध्ये गावो गावी अन्न धान्याची किट व इतर आर्थिक मदत देऊन जे कार्य केले ते कार्य म्हणजेच ईश्वर सेवाच होती हे मी स्वतः जवळून पहिले. अशा या दातृत्व ,कर्तृत्व ,विचारशील,कर्मठ ,सामाजिक कार्यकर्त्याच्या वाढदिवासानिमित्य मी चंद्रपूर जिल्हा गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने हार्दिक शुभेच्छा देतो व त्यांच्या हातून असेच कार्य घडो हि गुरुदेव चरणी प्रार्थना . जन्मदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा ...!

**प्रा . रुपलाल कावळे**
**चंद्रपूर जिल्हा प्रचार प्रमुख**
**अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम**

## उत्कृष्ट समाजसेवी अंकुशदादा

अंकुश दादा गुरुदेव सेवा मंडळाचे प्रचारक आहेत.अंकुश दादा यांच्या घरी दररोज सामुदायिक प्रार्थना होत असते . त्या करीत त्यांनी घरीच सामुदायिक प्रार्थना मंदिर सुरु केले आहे,त्यांच्या धर्मपत्नी दोन्ही मुली नित्यनेमाने दररोज सायंकाळी सामुदायिक प्रार्थना करीत असतात.त्याच सोबत अंकुश दादा यांनी घरी व्यायाम शाळा सुरु केली आहे. यांनी अनेक गावांमध्ये गुरुदेवांच्या मुर्त्या दिल्या आहेत. त्यांनी कोरोना काळात वरोरा – भद्रावती तालुक्यात अन्नदान केले . कोणीही छोटे मोठे कार्य घेऊन त्यांच्या घरी गेल्यास त्याला आर्थिक दृष्ट्या व बौद्धिक दृष्ट्या मार्गदर्शन करून सहकार्य करतात . त्यांनी वंदनीय तुकडोजी महाराज यांची ग्रामगीता गावा गावात प्रत्येक घरी जाण्यासाठी त्यांनी हजारो ग्रामगीता वाटल्या . हिंदी ग्रामगीता हि त्यांनी वाटल्या . त्यांनी पंढरपूर येथे ग्रामगीता मंदिर करीत स्वतः एक लक्ष रुपयाची आर्थिक मदत व इतरांकडून गोळा करून एक लक्ष रुपये असे दोन लक्ष रुपयाची मदत त्यांनी केली. आणि पंढरपूर च्या ग्रामगीता मंदिर ग्रामगीतेच्या प्रकाशनाला हि त्यांनी हजारी रुपयांचे आर्थिक सहकार्य केले . ते सुंदर भजन गातात . ते व्यायाम प्रिय आहेत त्यामुळे ते नेहमी जिल्ह्यातील विविध ठिकाणी बॉडी बिल्डिंग स्पर्धा आयोजित करीत असतात . ते पंढरपूर येथील ग्रामगीता मंदिराचे उत्सव समितिचे अध्यक्ष आहेत . त्यांची समाजसेवा बघून विद्यापिठाने त्यांना डॉक्टरेट या पदवीने सन्मानित केले . त्यांना नुकतेच मुंबई राजभवन येथे राज्यपालांनी त्यांचा सत्कार केला आहे . अशा या समाजसेवी अंकुश दादाला जन्मदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा .....!

**सेवकराम मिलमिले ,पंढरपूर.**

## तळमळीचे गुरुदेव उपासक अंकुशदादा



अंकुश दादा हे गुरु देवाचे प्रामाणिक निष्ठावंत गुरुदेव उपासक आहेत . त्यांच्या मनात गोरगरिबांसाठी कष्टकऱ्यांसाठी मदत करण्याची भावना आहे . ते नेहमी गरजूंना मदत करीत असतात . सर्वसामान्यांच्या मदतीसाठी ते सदैव्य तत्पर असतात . तळमळीचा गुरुदेव उपासक कसा असावा तो अंकुश दादा सारखा असावा असे मला वाटते ..त्यांच्या हातून अविरत समाज कार्य घडत राहो हीच गुरुदेव चरणी प्रार्थना . त्यांना जन्मदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा ..!

**दिलीप भोयर**
**संस्थापक अध्यक्ष, श्री गुरुदेव सेना (राष्ट्रीय)**


## सामाजिक कार्यात अग्रेसर अंकुश भाऊ



अंकुश भाऊ हे आमच्या साठी दैवत आहे . त्यांच्या सारखा सामाजिक कार्यकर्ता वरोरा भद्रावती विधानसभा क्षेत्रात मी अजून बघितला नाही . राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि संत गाडगे बाबा यांच्या विचारांवर कार्य करून गरजूना सर्वतोपरी मदत पोहचिविण्याचे कार्य अंकुश भाऊ करतात . त्यांनी कोरोना काळात इतरांकडून कुठलीही मदत न घेता स्व खर्चाने अन्न दान केले . अनेकांना घर बांधून दिले , युवकांना व्यवसाय उभा करण्यास मदत केली . अशा या आमच्या भाऊस जन्मदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

**हॅन्सन राव माजरी**

## डॉ .अंकुश आगलावे उत्कृष्ट सामाजिक कार्यकर्ते



अंकुश आगलावे वरोरा तालुक्यातील उत्कृष्ट सामाजिक कार्यकर्ते आहेत . राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या कार्याचा प्रभाव त्यांच्यावर आहे त्यांनी आज पावेतो जवळपास दोन हजार ग्रामगीता घराघरापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला . त्याचप्रमाणे गणेश उत्सव आणि दुर्गा उत्सव मध्ये प्रत्यक्ष मंडळाला भेट देत ग्रामगीता आणि भगवी टोपी भेट दिली दिली . त्यांचे हे कार्य कौतुकास्पद आहे . त्यांच्या हस्ते अशीच गुरुदेव सेवा घडत रावो अशी गुरुदेव चरणी प्रार्थना करतो . जय गुरु ..

**लक्ष्मणराव गमे**
**सर्वाधिकारी**
**गुरुकुंज आश्रम मोझरी**

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .